महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामिण रोजगार हमी योजने अंतर्गत वैयक्तीक लाभार्थ्यांच्या शेताच्या बांधावर व शेतक-यांच्या शेत जमिनीवर वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत तांत्रिक मान्यता व प्रशासकीय मान्यतेचे अधिकार निश्चित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

नियोजन विभाग (रोहयो)

शासन परिपत्रक क्रमांक : मग्रारो-२०१६/प्र.क्र.२१/मग्रारो-१

नवीन प्रशासन भवन, १६ वा मजला,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- ३० सप्टेंबर, २०२०.

वाचा:-

१. शासन निर्णय क्रमांक मग्रारो २०११ / प्र.क्र. १२०/रोहयो १० अ, दि. १४ मार्च, २०१२
२. शासन निर्णय क्रमांक मग्रारो २०१६ / प्र.क्र. ६१/मग्रारो- १, दि. १२ एप्रिल, २०१८.

प्रस्तावना:-

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत वैयक्तिक लाभार्थ्यांच्या शेतांच्या बांधावर व शेतकऱ्यांच्या शेतजमीनीवर वन विभागाच्या सामाजिक वनीकरण शाखेमार्फत वृक्ष लागवड कार्यक्रम राबविण्याच्या अनुषंगाने दिनांक १२ एप्रिल, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये सविस्तर सूचना प्रदान करण्यात आलेल्या आहेत. आता उपरोक्त संदर्भीय क्र. (२) शासन निर्णय अन्वये वृक्ष लागवड कार्यक्रम राबविण्याबाबत आदेश देण्यात आले आहेत. या शासन निर्णयामध्ये सुधारणा करण्यात येत असून, खालीलप्रमाणे सुधारित आदेश देण्यात येत आहेत.

शासन परिपत्रक :-

मुद्दा क्रमांक १.७ मध्ये वन विभागाच्या सामाजिक वनीकरण शाखेच्या अधिका-यांनी तांत्रिक मान्यता द्यावी व प्रशासकीय मान्यता संबंधित अधिका-यांनी द्यावी असे नमूद आहे.

उक्त नमूद अटी रद्द करुन त्यांमध्ये **"सदर कामे ग्रामपंचायतीकडून करुन घेण्यासाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत ग्रामपंचायती मार्फत वृक्ष लागवड कार्यक्रम राबविण्याबाबत पंचायत समितीमधील कृषी अैधिका-याने तांत्रिक मान्यता द्यावी तसेच प्रशासकीय मान्यता गटविकास अधिका-याने द्यावी"** अशी सुधारणा करण्यात येत आहे

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२००९३०१४३२३५३४१६ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

NAND KUMAR

Digitally signed by NAND KUMAR
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=c98b875883e76c14d91ed7b89546e6c11e439cad32d7f5cff4878 62cc567ee39, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=dcd3577ebf0e05e2a8b57095c152dc6cfb37c2bb83da1977 88645dd8a362ebc5, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=NAND KUMAR
Date: 2020.09.30 14:37:55 +05'30'

(नंदकुमार)
प्रधान सचिव (रो.ह.यो)

प्रति,

१. मा.मंत्री (रोहयो) यांचे खाजगी सचिव
२. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधानपरिषद
३. सचिव (रोहयो) यांचे स्विय सहायक
४. आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे,
५. संचालक, फलोत्पादन, पुणे,
६. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
७. सर्व जिल्हाधिकारी,
८. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
९. सर्व विभागीय कृषि सहसंचालक,
१०.संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, महाराष्ट्र राज्य, पुणे,
११.सर्व संचालक, कृषि आयुक्तालय, पुणे,
१२.सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,
१३.महालेखापाल, (लेखापरिक्षा), महाराष्ट्र १ / २, मुंबई / नागपूर,
१४.महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १ / २,मुंबई / नागपूर,
१५.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
१६.सर्व उपसचिव/अवर सचिव / कार्यासन अधिकारी, (रोहयो)
१७. निवडनस्ती मग्रारो-१,